# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्र.प्रक्रिया/२०१७/1532

दिनांक :- 1 JUL 2017

प्रति,

प्राचार्य.

सर्व पदवीका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था,

**विषय :- औरंगाबाद महसुली विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसुचित जमातीचे बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीचा सखोल तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी समिती गठित करण्याबाबत.**

सदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक :- आसंप्रस/प्र.क्र.२०/का ३/११८२ दिनांक २८/७/२०१६.

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/जापप्र/२०१६/२८५७ दि. २३ ऑगष्ट २०१६.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासन, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे संदर्भिय पत्रान्वये व त्यामध्ये नमुद दिनांक १ जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये औरंगाबाद महसुनी विभागात नामसाधर्माचा फायदा घेऊन अनुसुचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीची सखोल तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी समिती गठीत करण्यात आल्याचे कळविले आहे.

त्यानुसार आपणास आपल्या संस्थेमध्ये मन्नेरवारलु, कोळी महादेव कोळी, तडवी, राजगोंड ठाकुर, ठाकर या सनुसुचित जमातीच्या राखीव जागेवर सन १९९० पासुन प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची माहीती सोबत जोडलेल्या प्रपत्रात इंग्रजीमध्ये संगणक प्रणालीमध्ये (Exel) दिनांक २६/८/२०१६ पर्यंत सादर करण्यास कळविलेले आहे. तथापी सदर माहीती अद्यापपर्यंत **(सोबत जोडलेल्या यादीतील संस्था सोडुन )** सादर केलेली नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, सदरची माहीती कोणत्याही परिस्थितीत दिनांक ४/७/२०१७ पर्यंत या कार्यालयास सादर करावी, अन्यथा आपण माहीती सादर न केल्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच भविष्यात काही अडचणी उद्‌भवल्यास आपण जबाबदार राहाल, याची सुध्दा नोंद घ्यावी.

सहपत्र :- **वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- ~~मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरीता सादर.~~

✓ १) सहसंचालक तंत्रशिक्षण वि.का. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३


## माहीती सादर केलेल्या संस्थांची यादी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव |
|---|---|
| १ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती |
| २ | प्रा.राम मेघे इन्स्टि ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावती |
| ३ | अनुराधा अभि महा., चिखली, बुलढाणा |
| ४ | जवाहरलाल दर्डा अभि महा., यवतमाळ |
| ५ | प्रा.राम मेघे कॅालेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती |
| ६ | पंकज लध्दड इन्स्टि ऑफ टेक्नॉलॉजी, बुलढाणा |
| ७ | लक्ष्मीनारायण अग्रवाल इन्स्टि ऑफ टेक्नॉलॉजी, धामणगाव रेल्वे, अमरावती |
| ८ | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती |

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.